23-06-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 22-06-2025 23:30 Page 1

'फातोर्ड्याचा विकास माझ्या कारकिर्दीतच' पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com

'रोहित- विराटसाठी कठीण परीक्षा असेल' - गांगुली पान ४ वर

वेर्णा, सोमवार, २३ जून २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 291 | Verna, | facebook.com/dainikherald | Monday 23 June 2025 | Pages 4 | ₹ 4

निवडक

पंतप्रधान मोदी आणि इराणच्या राष्ट्राध्यक्षांनी फोनवरुन केली चर्चा

नवी दिल्ली, दि. २२ : इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या लढाईत अमेरिका आणि येमेनमधील हूती अतिरेकी संघटना यांनी एकाच दिवशी उडी घेतली आहे. यामुळे युद्ध विस्तारण्याचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्यात फोनवरुन चर्चा झाली. दोन्ही नेत्यांनी सध्याच्या परस्थितीबाबत चर्चा केली. लष्करी संघर्षाबाबत पंतप्रधान मोदींनी चिंता व्यक्त केली. तणाव त्वरेने कमी करण्यासाठी संवाद हाच उत्तम पर्याय असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले. प्रादेशिक शांतता, सुरक्षितता आणि स्थैर्यासाठी लष्करी संघर्ष थांबणे आवश्यक असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले. पंतप्रधान मोदींनी केलेल्या आवाहनाला इराण कसा प्रतिसाद देणार याकडे अनेकांचे लक्ष आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्यात फोनवरुन ४५ मिनिटे चर्चा झाली. दोन्ही देशांनी एकमेकांमधील दृढ करण्याची परस्परांना हमी दिली. भारत हा प्रादेशिक शांतता, सुरक्षितता आणि स्थैर्यासाठी काम करणारा देश असल्याचे इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान म्हणाले. तणाव करण्यासाठी भारताने सुचविलेल्या सल्ल्यांवर इराण गंभीरपणे विचार करेल, असे इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान म्हणाले. त्यांनी तणावाच्या काळातही इराण सोबत राहिल्याबद्दल पंतप्रधान मोदींचे आभार मानले. प्रादेशिक शांतता आणि स्थैर्यासाठी भारताची साथ महत्त्वाची असल्याचे ते म्हणाले. इस्रायल आणि इराण यांच्यात दहा दिवसांपासून लढाई सुरू आहे. अमेरिकेने इराणमध्ये निवडक ठिकाणी बॉम्ब टाकले. इराणची आण्विक शक्ती नष्ट करण्यासाठी ही कारवाई केल्याचे सांगत अमेरिकेने इस्रायलच्या इराण विरोधी कारवाईला पाठिंबा जाहीर केला. आवश्यकता भासल्यास इराण विरोधात आणखी कठोर कारवाई करू, असेही अमेरिकेने जाहीर केले. तर अमेरिका इराणवर हल्ला करणार असेल तर आम्ही अमेरिकेला धडा शिकवू, असा धमकीवजा इशारा येमेनमधील हुती अतिरेकी संघटनेने दिला आहे.

अग्निकल्लोळ अन् आक्रोश; हॉट एअर बलूनला आग

ब्राझिलिया, दि. २२ : हॉट एअर बलूनला लागलेल्या आगीत आठ जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. या अपघातातून १३ जण बचावले. दक्षिण ब्राझीलमधील सँटा कॅटरिना जिल्ह्यात ही घटना घडली. दुर्घटनेतून बचावलेल्या १३ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. सँटा कॅटरिनामधील लष्कराच्या अग्निशमन दलानं ही माहिती दिली.

शनिवारी सकाळच्या सुमारास हॉट एअर बलूनला आग लागली. या अपघातात ८ जणांचा मृत्यू होऊन १३ जण बचावल्याची माहिती राज्यपाल जॉर्गिन्हो मेल्लो यांना दिली. 'प्रॅया ग्रँडमध्ये रविवारी सकाळी घडलेल्या घटनेनं आम्हा सगळ्यांनाच धक्का बसला आहे. आमची बचाव पथकं घटनास्थळी पोहोचली आहेत. आतापर्यंत ८ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती हाती आलेली आहे,' असा तपशील मेल्लो यांनी एक्स पोस्ट करुन दिला. हॉट एअर बलूनला आग लागली तेव्हा त्यात एकूण २१ जण होते. बलूननं पेट घेतल्यानंतर त्याचा स्फोट झाला. अपघात घडला त्यावेळी बलून पर्वतीय भागात होता. त्यामुळे आता बचाव पथकांकडून या भागात शोध आणि मदतकार्य सुरु आहे. हॉट एअर बलूनच्या अपघाताचे थरारक व्हिडीओ समोर आलेले आहेत. बलूननं पेट घेतल्याचं व्हिडीओत दिसत आहेत. यानंतर बलूनमधून धूर निघू लागतो.

यानंतर पुढील काही क्षणांमध्ये हॉट एअर बलूनला लागलेलं बकेट जमिनीच्या दिशेनं कोसळू लागतं. पर्यटक उभे असलेल्या बकेटला आग लागलेली असते. अवघ्या काही सेकंदांमध्ये पेटतं बकेट खाली पडतं. या अपघातामुळे हॉट एअर बलूनमधील सुरक्षा, त्यांच्या क्षमतेचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे.

'मीच सुचवले प्रमोद सावंतांचे नाव' : गोविंद गावडे

भाजपमध्येच राहणार असल्याचा केला दावा | पंतप्रधान मोदींची केली स्तुती

■ टीम दैनिक हेराल्ड :

फोंडा, दि. २२ : मी भाजपमध्येच राहणार आहे. भाजप सोडण्याचा विचारही केलेला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे २०४७ चे व्हिजन' मजबूत करणे हेच माझे ध्येय आहे, असे सांगत प्रियोळचे आमदार आणि माजी मंत्री गोविंद गावडे यांनी मंत्रिमंडळातून वगळल्यानंतर खांडोळा-माशेल येथे प्रथमच जाहीर सभेला संबोधीत करत साष्टांग नमस्कार घातला. भाजपबाबत आपली निष्ठा स्पष्ट करताना विरोधकांवर त्यांनी सडकून टीका केली.



सभेला मोठ्या प्रमाणात गावडे यांचे समर्थक, हितचिंतक आणि ग्रामस्थ उपस्थित होते. गावडे यांनी आपल्या भाषणात २५ मे रोजी आयोजित प्रेरणा दिना'वरील आपल्या विधानांचे चुकीचे अर्थ लावले गेल्याची खंत व्यक्त केली. माध्यमांनी माझ्या विधानाचा विपर्यास केला. विरोधकांनी अफवा पसरवून माझ्या प्रतिमेला धक्का देण्याचा प्रयत्न केला, असा आरोप त्यांनी केला.

त्यांच्या विधानावर आधारित काही भाजप नेत्यांनी शिस्तभंगाची कारवाई करण्याची तात्काळ मागणी केल्यावर गावडे यांनी आश्चर्य व्यक्त केले. मी नेहमीच जनतेच्या प्रश्नांसाठी आवाज उठवतो. मी स्वतःसाठी नव्हे, तर बुडालेल्या लोकांसाठी बोलतो. मी एक सामान्य व्यक्ती नाही, तर लोकांचा आवाज आहे, असे ते म्हणाले.

गावडे यांनी स्पष्ट केले की, गेल्या साडेतीन वर्षांपासून ते स्थानिक समस्यांबाबत भाजपच्या राष्ट्रीय नेतृत्वाशी भेटीसाठी प्रयत्नशील आहेत. मात्र, अद्याप त्यांना ती संधी मिळालेली नाही. या मुद्द्यावर मी आता गोवा भाजप अध्यक्षांकडे औपचारिक पत्राद्वारे भेटीची मागणी केली आहे, असे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, २०१७ मध्ये माजी मुख्यमंत्री मनोहर पर्रिकर यांनी मला पाठींबा दिला. नंतर पर्रिकर आजारी असताना, प्रमोद सावंत यांचे नाव मी मुख्यमंत्रीपदासाठी सुचवले होते. शिरोडा पोटनिवडणुकीत सुभाष शिरोडकर यांच्या विजयासाठी मी सक्रिय सहभाग घेतला आणि मुख्यमंत्री सावंत यांची खुर्ची मजबूत केली.

आपली मंत्रीपदाची कामगिरी गौरवताना गावडे म्हणाले की, २०१७ पासून कला-संस्कृती, क्रीडा आणि नागरी प्रशासन अशा सात विभागांची जबाबदारी पार पाडताना मी प्रामाणिकपणे काम केले. विशेषतः राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन हे माझ्या कार्यकाळातील महत्त्वाचे यश आहे.

गावडे यांनी माजी आमदार विष्णू वाघ आणि माजी मुख्यमंत्री रवी नाईक यांच्या योगदानाची आठवणही यावेळी करून दिली. वाघ यांनी मला राजकारणात आणले आणि रवी नाईक यांनी कठीण काळात पाठिंबा दिला, असे ते म्हणाले.

आपली आदिवासी समाजासाठीची बांधिलकी अधोरेखित करताना गावडे म्हणाले, गेल्या २३ वर्षांपासून मी आदिवासी हक्कांसाठी लढत आहे. जर मी आमदार किंवा मंत्री नसेन, तर त्यांच्या समस्यांसाठी कोण लढेल?

मंत्रीपदावरून वगळल्याच्या निर्णयावर प्रतिक्रिया देताना गावडे म्हणाले, १८ जून क्रांती दिनी मला मंत्रिपदावरून वगळण्यात आले, आणि तो माझ्या जीवनातील सर्वात आनंदाचा दिवस होता. माझा संघर्ष हा फक्त पदासाठी नाही, तर जनतेसाठी आहे. गरज भासल्यास मी पुन्हा मंत्रीपदाचा त्याग करण्यास तयार आहे.

माध्यमांतील काही चर्चांवर प्रतिक्रिया देताना त्यांनी स्पष्ट केले की , माझ्याबद्दल असा गैरप्रचार करण्यात आला की मी बंडखोर आहे, मतदारसंघात माझा प्रभाव कमी झाला आहे. पण आज जाहीर सभेला उपस्थित झालेल्या हजारोंच्या उपस्थितीने हे सर्व खोटं ठरवलं आहे.

विस्मरणात गेलेल्या हस्तलिखितांचा शोध सुरू

मडगाव, दि. २२ :

गोव्याच्या समृद्ध साहित्यिक आणि बौद्धिक वारशाचे जतन करण्यासाठी राज्य अभिलेखागार विभागाने १ जुलैपासून राज्यभरात ऐतिहासिक हस्तलिखितांच्या शोधासाठी सर्वेक्षण मोहिम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. ज्ञान भारतम' या राष्ट्रीय उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर राबवली जाणारी ही मोहिम, नुकतीच जाहीर झालेल्या गोवा राज्य हस्तलिखित अभियानाचा एक भाग असेल.

या मोहिमेअंतर्गत, विभागाच्या अधिकृत पथकांकडून राज्यातील खाजगी घरे, ग्रंथालये, चर्च, मंदिरे आणि पारंपरिक कुटुंबांची वाडेसंस्था याठिकाणी भेटी देऊन शतकानुशतके जुन्या हस्तलिखितांचा शोध घेतला जाणार आहे. या मोहिमेचे उद्दिष्ट दुर्मिळ व दुर्लक्षित दस्तऐवजांचे दस्तऐवजीकरण, डिजिटायझेशन आणि जतन करणे हे आहे.

याबाबत अधिक माहिती देताना राज्य अभिलेखागार विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यानी सांगितले की , गोव्यातील अनेक कुटुंबांत, संस्थांमध्ये आणि धार्मिक स्थळी ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे दस्तऐवज आणि हस्तलिखिते अस्तित्वात आहेत. ही कागदपत्रे पिढ्यानपिढ्या जपली गेली आहेत, मात्र अनेकदा विस्मरणात गेली आहेत. आमचे उद्दिष्ट केवळ दस्तऐवजीकरणाचे आहे . मूळ मालकी हक्क कायम राहतील; आम्ही कोणतेही कागदजत्र हटवणार नाही.

प्रारंभिक टप्प्यात ग्रंथालये, चर्च आणि मंदिरांना भेटी दिल्या जातील. त्यानंतर, सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या घराण्यांच्या खाजगी संग्रहांमध्ये शोध मोहीम राबवण्यात येईल. या दस्तऐवजांमध्ये स्थानिक राजवटीतील व्यवहार, स्वातंत्र्यसैनिकांचे संवाद, तसेच सामाजिक, धार्मिक आणि राजकीय जीवनाशी संबंधित माहिती असलेल्या नोंदींचा समावेश असण्याची शक्यता आहे.

प्रत्येक हस्तलिखिताचे स्थान, प्रकृती व ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन एक डिजिटल कॅटलॉग तयार केला जाणार आहे. भविष्यातील अभ्यासक व संशोधकांसाठी हे दस्तऐवज प्रवेशयोग्य करण्याचा विभागाचा मानस आहे.

पान २ ▶

सरकारचे वारसा धोरण केवळ घोषणेपुरतेच !

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ **'सेंट ऑगस्टीन टॉवर' जवळील बांधकामांवर सेव्ह ओल्ड गोवा ॲक्शन कमिटीचा तीव्र आक्षेप**

पणजी, दि. २२ : जुना गोव्यातील जागतिक वारसा दर्जा लाभलेल्या 'सेंट ऑगस्टीन टॉवर' च्या संरक्षित बफर झोनमध्ये सुरू असलेल्या एका नव्या बांधकाम प्रकल्पावर सेव्ह ओल्ड गोवा ॲक्शन कमिटी आणि स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. कार्यकर्त्यांनी हा प्रकल्प कोणतीही अधिकृत परवानगी न घेता सुरू करण्यात आल्याचा आरोप केला असून, संबंधित परिसरात झाडांची कत्तल केल्याचीही माहिती दिली आहे.

या संदर्भात बोलताना, ॲक्शन कमिटीचे सदस्य विन्सेंट डि'सिल्वा म्हणाले की, 'सेंट ऑगस्टीन टॉवर'च्या अगदी शेजारी नव्याने बांधकाम सुरू आहे. हा प्रकल्प पंचायत, वन विभाग अथवा भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांच्याकडून परवानगी घेऊन सुरू करण्यात आला आहे का, याची कोणतीही स्पष्ट माहिती नाही. आम्ही पूर्वीपासूनच वारंवार सांगत आलो आहोत की या संवेदनशील वारसास्थळाच्या बफर झोनमध्ये कोणतेही बांधकाम होऊ नये.

डि'सिल्वा यांनी स्पष्ट केले की बांधकामासाठी क्षेत्रात खांब उभारण्यात आले असून, परिसराला लोखंडी पत्र्यांचे कुंपण घालण्यात आले आहे. मात्र, कोणत्याही अधिकृत मंजुरीचे फलक जागेवर लावण्यात आलेले नाहीत. ज्यावेळी सर्व संबंधित परवानग्या घेण्यात येतात, त्यावेळी त्या जागेवर अधिकृत डिस्प्ले बोर्ड लावणे बंधनकारक असते. पण येथे तसे काहीही दिसून येत नाही, असे ते म्हणाले.

या पार्श्वभूमीवर, डि'सिल्वा यांनी म्हटले, युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळात गणल्या जाणाऱ्या बॉम जीझस बॅसिलिका परिसरातील बफर झोनमध्ये कोणतेही विकास काम किंवा बांधकाम होणे अयोग्य आहे. जुन्या गोव्याच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अस्मितेच्या रक्षणासाठी आम्ही या संपूर्ण क्षेत्रासाठी एक व्यापक मास्टर प्लॅन तयार करण्याची मागणी करतो.

समितीच्या दुसऱ्या सदस्या कॅटरिना पेरेस यांनी याबाबत टीका करत म्हटले की, टीसीपी मंत्री विश्वजित राणे यांनी सार्वजनिकरित्या सांगितले होते की बफर झोनमध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम होणार नाही. पण तरीदेखील येथे व्याख्या केंद्र आणि पोलिस स्टेशन बांधण्यात आले, आणि आता हे नवीन बांधकाम सुरू आहे. हे नेमके कसे आणि कोणाच्या परवानगीने चालते आहे?

तसेच स्थानिक प्रतिनिधींनी स्वतः या ठिकाणी भेट देऊन वस्तुस्थितीची पाहणी करावी, अशी मागणी त्यांनी केली.समितीच्या जेनिफर लोबो यांनीही गटाच्या संतापाचा पुनरुच्चार करत म्हटले,आम्ही आधीपासूनच बफर झोनमध्ये झालेल्या सर्व प्रकल्पांचा निषेध केला आहे. वारंवार निषेध असूनही बांधकाम सुरूच राहते, याचे उत्तर कोण देणार? आम्ही मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांना यामध्ये त्वरित लक्ष घालून मास्टर प्लॅन तयार करण्याची मागणी करतो.

सेव्ह ओल्ड गोवा ॲक्शन कमिटीच्या मते, अशा प्रकारचे अनियंत्रित आणि बेकायदेशीर बांधकाम जुन्या गोव्याच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि पर्यावरणीय समतोलाला मोठा धोका पोहोचवत आहे. यासाठी त्यांनी संबंधित यंत्रणांकडून तातडीने कारवाई करून अशा प्रकारच्या बांधकामांना आळा घालण्याची मागणी केली आहे.

अमेरिकेचा इराणच्या अणुस्थळांवर जोरदार हल्ला

इस्रायल-इराण संघर्षात अमेरिकेची एंट्री | जागतिक चिंता वाढली : अनेक देशांनी केला अमेरिकेचा निषेध

तेहरान, दि. २२ :

इस्रायल आणि इराण यांच्यात वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, अमेरिकेने शनिवारी उशिरा इराणमधील तीन महत्त्वाच्या अणुस्थळांवर हवाई हल्ले करत मध्य पूर्वेतील तणाव अधिक तीव्र केला आहे. अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या कारवाईचे नेतृत्व केल्याचा दावा करत ती अत्यंत यशस्वी असल्याचे म्हटले आहे.

ट्रम्प यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत सांगितले की, इराणने आता हे युद्ध संपवण्याची तयारी दाखवली पाहिजे. त्यांनी असेही स्पष्ट केले की अमेरिकेने फोर्डो अणुस्थळावर बॉम्बचा पूर्ण पेलोड' टाकला, ज्यामुळे प्रचंड विध्वंस झाला.इराणी राज्य माध्यमांनी देखील या हल्ल्याची कबुली दिली असून, शत्रूच्या हल्ल्यांमुळे फोर्डो अणुस्थळाचे काही भाग गंभीरपणे बाधित झाले आहेत,असे जाहीर करण्यात आले.

या संघर्षाची सुरुवात १३ जून रोजी इस्रायलच्या इराणवरील हल्ल्याने झाली. इस्रायलने तेहरानच्या अणुशस्त्र कार्यक्रमास अडथळा आणण्यासाठी ही कारवाई केली. गाझा येथे सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर, ही कारवाई हा रोजच्या हल्ल्यांचा भाग बनत आहे . इस्रायलचा दावा आहे की इराण अण्वस्त्रे बनवण्याचा प्रयत्न करत आहे, तर इराण नेहमी म्हणते की त्यांचा अणुकार्यक्रम पूर्णपणे शांततामूलक आहे. इराण हा अणुप्रसार प्रतिबंध करार चा भाग आहे, पण इस्रायल नाही.

अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणने त्वरित उत्तर दिले. इराणी रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सनुसार, इराणने किमान ४० क्षेपणास्त्रे डागली, ज्यामध्ये खोरमशहर-४'हे अत्याधुनिक आणि सर्वात जड पेलोड वाहून नेणारे क्षेपणास्त्र वापरण्यात आले. या क्षेपणास्त्राचे पल्ला २००० किमी असून, अण्वस्त्र वाहून नेण्याची क्षमता असल्याचा इराणचा दावा आहे.इराणी सरकारी टीव्हीने खोरमशहर-४ क्षेपणास्त्राच्या चाचणी-फायरिंगचे फुटेज दाखवत सांगितले की, या क्षेपणास्त्राने इस्रायलमधील विशिष्ट बंधाऱ्यावर लक्ष्य केले गेले.

अमेरिकेच्या या कृतीवर अनेक देशांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. रशियाच्या सुरक्षा परिषदेचे उपाध्यक्ष दिमित्री मेदवेदेव यांनी ट्रम्प यांच्यावर टीका करत म्हटले की, शांतता प्रस्थापित करणारे राष्ट्राध्यक्ष म्हणून आलेले ट्रम्प आता अमेरिकेसाठी नवीन युद्ध सुरू करत आहेत.तसेच त्यांनी उपहासाने म्हटले, या कारवाईसाठी ट्रम्प यांना नोबेल शांतता पुरस्कार नक्कीच मिळणार नाही.

फ्रान्सच्या परराष्ट्र मंत्री जीन-नोएल बॅरोट यांनी स्पष्टपणे म्हटले की, फ्रान्स हल्ल्यांमध्ये सामील नव्हता आणि वाटाघाटींच्या मार्गानेच तोडगा काढण्यावर आमचा विश्वास आहे.चीनच्या सीजीटीएन या राज्य प्रसारक संस्थेने अमेरिकेच्या हल्ल्यांवर टीका करत म्हटले की, हे एक धोकादायक वळण आहे. मध्य पूर्वेतील लष्करी हस्तक्षेप नेहमीच अनपेक्षित, दीर्घकालीन आणि विनाशकारी परिणाम देतात.पोप लिओ (चौदावे) यांनी व्हॅटिकनमधील अँजेलस प्रार्थनेदरम्यान म्हटले की, युद्ध एक अपूरणीय दरी बनण्यापूर्वी ते थांबवणे ही आंतरराष्ट्रीय समुदायाची नैतिक जबाबदारी आहे.

तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, हवाई हल्ल्यांनी अणुकार्यक्रमाचे पायाभूत रचनांवर परिणाम होऊ शकतो, पण जे ज्ञान इराणने कमावले आहे ते नष्ट करणे अशक्य आहे.पाश्चिमात्य देशांनीही हे मान्य केले आहे की इराणने अपरिवर्तनीय अणुज्ञान मिळवले आहे.

इराणचे माजी सम्राट रेझा शाह यांचे पुत्र रेझा पहलवी यांनी ट्रम्प यांचे समर्थन करत म्हटले की, ही कारवाई खामेनीच्या दहशतवादी राजवटीच्या अण्वस्त्र स्वप्नांचा परिणाम आहे.दरम्यान, रशियाच्या स्टेट ड्यूमाने चेतावणी दिली आहे की, ही कारवाई तिसऱ्या महायुद्धाचा धोका निर्माण करू शकते आणि वॉशिंग्टनने तेहरानच्या कठोर प्रतिसादाची तयारी ठेवावी, असेही नमूद केले.

अमेरिकेच्या हल्ल्यांमुळे मध्य पूर्व पुन्हा एकदा संकटाच्या उंबरठ्यावर उभा आहे. एकीकडे युद्धाच्या वावटळीत राजकीय प्रतिशोध आणि तणाव आहे, तर दुसरीकडे जागतिक समुदायाने शांततेचा मार्ग सुचवला आहे.आता सर्वांचे लक्ष आहे की, हा संघर्ष राजनैतिक संवादाच्या दिशेने वळतो की आणखी एका महाविनाशाकडे, हे पुढील काही दिवसांत स्पष्ट होईल.

आतापर्यंत काय घडले

१ : अमेरिकेचा इराणमधील तीन अणुस्थळांवर अत्यंत यशस्वी' हल्ला - ट्रम्प यांची घोषणा
२; इराणची कबुली - फोर्डो अणुस्थळावर शत्रूचा हल्ला, इराणचा क्षेपणास्त्रांनी जोरदार प्रतिहल्ला
३: इस्रायल-इराण संघर्ष पुन्हा पेटला; गाझा युद्धाच्या पार्श्वभूमीवर तणाव वाढला
४: रशिया, फ्रान्स, चीन यांसारख्या प्रमुख देशांकडून अमेरिका आणि इराण दोघांनाही संयमाचे आवाहन
५: तिसऱ्या महायुद्धाचा धोका - रशियाचा इशारा; पोप लिओ यांचे युद्धविरामाचे भावनिक आवाहन